**कार्यकारी अभियंता / ग-उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**दुसरा मजला, सनशाईन प्लाझा, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय**
**मार्ग, दादर (पुर्व), मुंबई- ४०००१४**

म्हाडा MHADA

**जा.क्र. काअ/ग-उत्तर/उवि- ४/ DIS-                    /२०२६          दिनांक :-**

**म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ७७(ब) अंतर्गत धोक्याचे सूचनापत्र**

**प्रति,**

**सर्व भाडेकरु/ रहिवाशी व**
**इमारतीचे मालक,**
**इमारत क्र. २० जमाल हाउस, दर्गा स्ट्रिट माहिम, मुंबई -१६**
**DIS-**

COURT RECEIVER, HIGH COURT,
SUIT NO. ४८८९ OF २००२ BANK OF INDIA
BLDG.,२ND FLR M. G. ROAD,FORTMUMBAI-
४०० ०२३.
**DIS-**

**विषय :-** उपकरप्राप्त इमारत क्र. २० जमाल हाउस, दर्गा स्ट्रिट माहिम, मुंबई -१६ च्या धोकादायक संरचनात्मक स्थितीबाबत इशारा सूचना उपकर क्रमांक GN- ५२९०

**संदर्भ :-** १) मेसर्स डिझाइन ग्रुप यांनी या कार्यालयास दि.२३.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला संरचनात्मक परिक्षण अहवाल.

२) या कार्यालयाचे धोक्याचे सुचना पत्र क्र. DIS-१३९००२५ दि. २५.०५.२०२६.

३) या कार्यालयाचे पत्र क्र.DIS-१३९४१९७ दि. २९.०५.२०२५

**महोदय / महोदया,**

या कार्यालयातर्फे मेसर्स डिझाइन ग्रुप यांनी विषयांकित इमारतीचा संरचनात्मक परिक्षण अहवाल केला असून इमारतीची वर्गवारी C-२A म्हणजेच **To be Evacuated partial demolition required major structural repair** आहे. सदर अहवालाच्या आधारे, इमारत धोकादायक असल्याची या कार्यालयामार्फत निश्चिती करण्यात आली. या कार्यालयामार्फत संदर्भिय पत्र क्र. २,३ नुसार आपणांस निष्कासन बाबत कळविलेले आहे. अद्याप आपणांमार्फत कोणतेही कागदपत्रे मंडळास सादर झालेले नाहीत.

**प्रस्तुत प्रकरणी आपणास पुन:श्च सूचित करण्यात येते कि, विषयांकित इमारतीत वास्तव्य करणे धोकादायक असून आपण आपली सदनिका तातडीने रिक्त करुन इमारत निष्कासित करावी.** आपणास पर्यायी निवासस्थानासाठी म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील गाळे तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येतील तसेच संदर्भ क्र. २ व ३ नुसार आपली कागदपत्रे या कार्यालयास सादर करावीत. जेणेकरुन आपणास संक्रमण शिबीरातील गाळा उपलब्ध करुन देणे या कार्यालयास शक्य होईल.

वरील बाबींची पूर्तता करुन आपण आपला गाळा निष्कासित करुन इतरत्र स्थलांतरीत झाला नाहीत व इमारतीत आपले वास्तव्य सुरु ठेवलेत आणि त्या कालावधीत इमारतीत पडझडीने अपघात घडून जीवित अथवा वित्त हानी झाल्यास, त्यास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल याची आपण गांभिर्याने नोंद घ्यावी.

**आपला विश्वासू ,**

**कार्यकारी अभियंता ग-उत्तर विभाग**
**मुं.इ.दु व पु.मंडळ, मुंबई**

प्रत,

- मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु व पु.मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव सविनय सादर.**DIS-**
- उपमुख्य अभियंता (परिमंडळ-४) / मुं.इ.दु व पु.मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव सादर.**DIS-**
- उपमुख्य अधिकारी (सं.गा.) / मुं.इ.दु व पु.मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहिती व कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित. **DIS-**
- मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, माहिम पोलिस स्टेशन, दादर, मुंबई यांस माहिती व कार्यवाहीस्तव रवाना. **DIS-**
- कार्यकारी अभियंता (इ व का), ग- उत्तर, मुंबई महानगरपालिका, खोली क्र. ३९, पहिला मजला, हरिशचंद्र येवले रस्ता, दादर (प), मुंबई -४०००२८ यांस माहिती व कार्यवाहीस्तव रवाना. **DIS-**
- वरिष्ठ अग्निशमन अधिकारी, ग-उत्तर अग्निशमन केंद्र, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांस माहिती व कार्यवाहीस्तव रवाना. **DIS-**
- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी/ प्राधिकरण , गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव तथा म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकामी रवाना. **DIS-**
- मुख्य जनसंपर्क अधिकारी/ प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव तथा सदर सूचनापत्र मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेकामी रवाना. **DIS-**
- इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविणेसाठी **DIS-**
  - इमारतीच्या घरमालकाची नोंद या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाच्या अनुषंगाने नमूद करण्यात आलेली आहे. तथापि सदर नोंदीव्यतिरिक्त इमारतीच्या मालकीचे अन्य दावेदार असल्यास त्यांनी व इमारतीच्या सर्व भाडेकरु/ रहिवाशी यांनी सदर धोक्याच्या सूचनेची दखल घेणेकामी या नोटीशीची प्रत इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविण्यात येत आहेत.